नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३३८ Issue - 338 | वार शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ Blow- Saturday Date 26 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


# 'वक्फ'ला स्थगिती अशक्य

## केंद्र सरकारची भूमिका, सर्वोच्च न्यायालयात १३३२ पानी प्रतिज्ञापत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: केंद्र सरकारने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात वक्फ कायद्याचे जोरदार समर्थन केले. संसदेने मंजूर केल्याने घटनात्मक वैधता प्राप्त झालेल्या या कायद्याला स्थगिती देता येणार नाही, अशी भूमिका मांडून सरकारने या कायद्याविरोधातील याचिका फेटाळण्याची विनंती न्यायालयाला केली.

वक्फ दुरुस्ती कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्र सरकारने १,३३२ पानी प्राथमिक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. या कायद्यातील काही तरतुदींबाबत अपप्रचार करण्यात येत असल्याचा दावा प्रतिज्ञापत्रात करण्यात आला आहे. 'कोणताही प्रतिकूल परिणाम लक्षात न घेता या कायद्याविरोधातील याचिकांवरील सुनावणीदरम्यान कायद्याला अंशतः किंवा पूर्णतः स्थगिती देणे अयोग्य ठरेल. त्यामुळे कायद्याला किंवा त्यातील तरतुदींना स्थगिती देऊ नये, अशी विनंती सरकारने न्यायालयाला केली. 'वक्फ वापरा'च्या मालमत्तांची आठ एप्रिलपर्यंत नोंदणी करण्याबाबतही सरकारने प्रतिज्ञापत्रात भाष्य केले आहे. यासंदर्भातील तरतुदीत अंतरिम आदेशाद्वारे हस्तक्षेप केल्यास ती 'न्यायालयीन आदेशाद्वारे कायदाराजची निर्मिती' ठरेल, असेही सरकारने म्हटले आहे.




संसदेने मंजूर केलेल्या कायद्यांना घटनात्मक ग्राह्यता लागू होते, असे न्यायालयाने नमूद केले. घटनात्मक ग्राह्यतेची प्रचलित तत्त्वे, कायदे मंजुरीची लोकशाही पद्धत लक्षात घेता कोणताही अंतरिम आदेश देताना सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता केंद्र सरकारने व्यक्त केली आहे. वक्फ दुरुस्ती कायद्याद्वारे वक्फ मालमत्तांची ओळख, वर्गीकरण आणि नियमन सोपे करण्यात आले असून, त्यांना न्यायालयीन देखरेखीच्या कक्षेत आणण्यात आले आहे.

मालमत्तेचा अधिकार, धार्मिक स्वातंत्र्य आणि दानधर्म या बाबी कायद्याच्या चौकटीत आणण्यात आल्या असून, पारदर्शकता आणि दायित्व निश्चित करण्यात आले आहे, असे केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. वक्फ विधेयकासंदर्भातील याचिकांवर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या खंडपीठापुढे ५ मे रोजी सुनावणी होणार आहे.

# अमेरिकेकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध; आम्ही पाठीशी : तुलसी गबार्ड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या घडामोडी सुरु झाल्या आहेत. भारत आणि पाकिस्ताननं एकमेकांची कोंडी करणाऱ्या निर्णयांचा धडाका लावला आहे. यानंतर आता अमेरिकेनं मोठी घोषणा केली आहे. पहलगाम हल्ला घडवून आणणाऱ्या दहशतवाद्यांना पकडण्यात अमेरिका भारताला मदत करणार आहे. याची घोषणा ट्रम्प प्रशासनात राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गबार्ड यांनी केली आहे. त्यांनी या भीषण हल्ल्याचा कठोर शब्दांत निषेध केला. भारतीय नागरिकांबद्दल त्यांनी सहवेदना व्यक्त केल्या.

भारतीय वंशाच्या असलेल्या तुलसी गबार्ड यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरुन एक पोस्ट केली आहे. 'या भीषण इस्लामी दहशतवादी हल्ल्यानंतर आम्ही भारतासोबत ठामपणे उभे आहोत. या हल्ल्यात २६ जणांनी जीव गमवावा लागला. माझ्या प्रार्थना आणि सहवेदना मृतांच्या कुटुंबियांच्या, नातेवाईकांच्या सोबत आहेत. आम्ही तुमच्या सोबत आहोत. या निर्घृण हल्ल्याला जबाबदार असलेल्या लोकांना पकडण्यासाठी आमचा पाठिंबा आहे,' असं ट्रम्प प्रशासनात राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गबार्ड यांनी एक्स पोस्टमध्ये नमूद केलं आहे. पहलगाममध्ये झालेला हल्ला काश्मीरमध्ये झालेल्या आतापर्यंतच्या सर्वात निर्घृण हल्ल्यांपैकी एक आहे. या हल्ल्यात २६ जणांचा हकनाक बळी गेला. दहशतवाद्यांनी धर्म विचारुन गोळ्या झाडल्या. त्यामुळे या हल्ल्याची स्पष्ट किनार आहे. याच कारणास्तव गबार्ड यांनी त्यांच्या पोस्टमध्ये इस्लामी दहशतवादी हल्ला असा उल्लेख केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारनं आक्रमक पवित्रा घेतला आहे. पाकिस्तानी नागरिकांना देण्यात आलेला व्हिसा रद्द करण्यात आला आहे. त्यांना तातडीनं देश सोडण्याचे आदेश दिले गेले आहेत. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी सगळ्या मुख्यमंत्र्यांशी आज फोनवरुन संवाद साधला. पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि माघारी धाडा, अशा सूचना शहांनी मुख्यमंत्र्यांना दिल्या आहेत.

# भारत ॲक्शन मोडवर; मिसाइलनंतर आता हायपरसोनिक शस्त्र देखील सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहेत. भारत आता पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर देण्याच्या तयारीत दिसत आहे. शुक्रवारी हायपरसोनिक शस्त्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ॲडव्हान्स्ड स्क्रॅमजेट कनेक्टेड टेस्ट फॅसिलिटी (डउझढ)ची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. याआधी गुरुवारी भारतीय नौदलाने अरबी समुद्रात या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली होती.


### भारताच्या खऱ्या हल्ल्यापूर्वीच पाकिस्तानचे धाबे दणाणणार

डीआरडीओने म्हटले आहे की, हैदराबादस्थित डीआरडीएल प्रयोगशाळेने हायपरसोनिक शस्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे . डीआरडीएलने २५ एप्रिल २०२५ला हैदराबाद मध्ये नव्याने निर्माण केलेल्या ॲडव्हान्स्ड स्क्रॅमजेट कनेक्टेड टेस्ट फॅसिलिटी (एससीपीटी) येथे १००० सेकंदांपेक्षा जास्त कालावधीसाठी ॲक्टिव्ह कूल्ड स्क्रॅमजेट सबस्केल कम्बस्टरची ग्राउंड टेस्टिंग केली. ही ग्राउंड टेस्टिंग जानेवारी २०२५ मध्ये १२० सेकंदांसाठी घेण्यात आलेल्या पूर्वीच्या चाचणीचा पुढील टप्पा आहे. आजच्या यशस्वी चाचणीसह ही प्रणाली लवकरच संपूर्ण ताकदीने कॉम्बस्टर चाचणीसाठी तयार होणार आहे.

तत्पूर्वी, पहलगाम हल्ल्याच्या ४८ तासांच्या आत भारताने गुरुवारी युद्धनौका आयएनएस सुरतमधून क्षेपणास्त्राची चाचणी केली ज्यातून शत्रूंना कडक संदेश दिला आहे. नौदलाने मध्यम पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र डागले आहे. नौदलाच्या म्हणण्यानुसार, या काळात भारताचे स्वदेशी क्षेपणास्त्र विध्वंसक नौका आयएनएस सुरतने समुद्रात लक्ष्य गाठण्यात यश मिळवले आहे. या चाचणी दरम्यान, भारतीय नौदलाच्या नवीनतम स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र विनाशक आयएनएस सुरतने समुद्रात अचूकपणे हल्ला केला आहे.

काही दिवसांपूर्वीच, डीआरडीओ आणि भारतीय नौदलाने स्वदेशी रुपात विकसित केलेल्या व्हर्टिकल-लांच्ड शॉर्ट-रेंज सरफेस-टू-एअर क्षेपणास्त्राची (तडडठडच्) यशस्वी चाचणी घेतली होती. ही चाचणी २६ मार्चला दुपारी १२ वाजता ओडिशा किनाऱ्यावरील चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी श्रेणी (खढठ) येथून घेण्यात आली. या कालावधीत, क्षेपणास्त्राने जमिनीवरून येणाऱ्या उभ्या लाँचरवरून अतिशय जवळून आणि कमी उंचीवर असलेल्या एका हाय-स्पीड हवाई लक्ष्याला हाणून पाडले होते.

# सिंधू नदीचं पाणी रोखण्यासाठी आखली योजना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पहलगाम हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. भारतानं सिंधू जल समझोता रद्द केला आहे. पाकिस्तानला सिंधू नदीतील पाण्याचा एक थेंबही मिळू नये यासाठी आता भारतानं काम सुरु केलं आहे. भारतानं सिंधू जल सामंजस्य करार रद्द करण्याचा निर्णय घेत पाकिस्तानात एकच खळबळ उडाली.

सिंधूचं पाणी रोखणं म्हणजे युद्ध कारवाई असल्याचा दावा पाकिस्ताननं केला. पण पाकिस्तान सरकारच्या धमक्या आणि इशाऱ्यांना भीक न लागता केंद्र सरकारनं सिंधू नदीचं पाणी रोखण्यासाठी योजना आखली आहे. याची माहिती केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिली.


१९६० मध्ये लागू झालेला सिंधू जल समझोता भारतानं पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर रद्द केला आहे. त्यामुळे भारतातून पाकिस्तानमध्ये जाणारा सिंधू नदीचा प्रवाह रोखला जाईल. यासाठी सिंधू नदीच्या किनाऱ्यांवरील धरणांची क्षमता वाढवण्यात येईल. त्यामुळे पाणी रोखण्याची क्षमता वाढेल. मोदी सरकारनं तीन टप्प्यांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची योजना आखली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानची अवस्था बिकट होणार आहे. सिंधू आणि तिच्या उपनद्या पाकिस्तानसाठी लाईफ लाईन आहेत.

सिंधू नदीचा प्रवाह रोखण्यासंदर्भातील महत्त्वाची माहिती जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिली. 'सिंधू जल कराराच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या निर्णयाचं पूर्णपणे पालन करण्यात येईल. याची अंमलबजावणी तीन टप्प्यांमध्ये होईल. अल्प, मध्य आणि दीर्घ अशा टप्प्यांमध्ये निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. भारताकडून पाकिस्तानला एक थेंबही पाणी जाणार नाही, याची संपूर्ण व्यवस्था करण्यात येईल,' अशी माहिती पाटील यांनी दिली. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानला जाणारं पाणी रोखण्याची तयारी सुरु करण्यात आलेली आहे. याचे परिणाम लवकरच दिसू लागतील. सरकार धरणांची क्षमता वाढवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करेल. गाळ काढून अधिक पाणी साठवलं जाईल. जागतिक बँकेनं भारत, पाकिस्तानमध्ये करार घडवून आणला होता. त्यांना याची माहिती भारत सरकारनं दिली आहे.

या निर्णयावर तातडीनं काम सुरु करण्यात आलं आहे. आज याच विषयावर चर्चा करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्यात एक महत्त्वाची बैठक झाली.

# महाराष्ट्रातील ५०० पर्यटक आतापर्यंत राज्यात दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर विविध प्रयत्नांतून गेल्या २ दिवसात आतापर्यंत सुमारे ५०० पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने इंडिगो आणि एअर इंडियाच्या दोन विशेष विमानाची व्यवस्था पर्यटकांसाठी केली होती, त्यातून १८४ पर्यटक मुंबईत दाखल झाले आहेत. दरम्यान, आणखी २३२ प्रवाशांसाठी उद्या एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकार करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेनंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना तातडीने काश्मिरला जाण्यास सांगितले होते. गिरीश महाजन यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एकूणच स्थितीचा आढावा घेतला. उद्यासाठी आणखी विमाने करायची असतील, तर करा, त्याचा खर्च राज्य सरकार देईल, असे त्यांनी सांगितले. गिरीश महाजन यांनी लष्कराच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांची भेट घेतली, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हीडिओ कॉलवर त्या पर्यटकांशी संवाद साधला आणि उपचार करणार्या तेथील डॉक्टरांचे आभारही मानले.

### मंत्रालयात विशेष कक्ष, महाराष्ट्र सदनातूनही समन्वय

काश्मिरातील महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केले जात आहे. काही पर्यटकांची कालिका धाम, जम्मू येथे राहण्याची व्यवस्था केली गेली.

अमरावती येथील सुमारे १४ पर्यटक येथे थांबले होते. काही पर्यटक मिळेल त्या व्यवस्थेने जम्मूवरुन दिल्लीकडे रवाना झाले असून, त्यांची दिल्ली येथे व्यवस्था करण्यात येत आहे. उद्या काश्मिरातून येणाऱ्या विशेष विमानात अकोला, अमरावती येथील पर्यटक असणार आहेत. दिल्लीत महाराष्ट्र सदनात प्रवाशांच्या याद्या सातत्याने तयार केल्या जात असून, गरज पडली तर परवाही विशेष विमान करण्याची तयारी राज्य सरकारतर्फे करण्यात येत आहे.

### विदर्भ आणि मराठवाड्यात राहणार मिश्र वातावरण


### हवामान विभागाचा अंदाज

# अलर्ट! तप्त उन्हाळ्यात महाराष्ट्रात पावसासह गारपिटीचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रभर नागरिकांना सध्या तीव्र उन्हाचा सामना करावा लागत आहे. विदर्भात तर तापमानाचा रोज नवा उच्चांक पाहायला मिळत आहे. तर मराठवाड्यातही सूर्य तळपला आहे. अशातच राज्यात पुढील चार दिवस मिश्र स्वरुपाचे वातावरण (चरहरीरिहीर थशरींहशी) राहणार असल्याची माहिती आहे. भारतीय हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

हवामान तज्ज्ञ के एस होसाळीकर यांनी एक्स हँडलवर ट्विट करत यासंदर्भीत माहिती दिली आहे. ते म्हणाले, हवामान विभागाने राज्यात पुढील ४ ते ५ दिवसांत मिश्र प्रकारचे तीव्र हवामानची शक्यता वर्तवली आहे. विदर्भात २७ आणि २८ एप्रिलला काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. अकोला आणि चंद्रपूरमध्येच उष्णतेच्या लाटेचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता गारपिटीचाही अंदाज आहे. ज्यासाठी हवामान विभागाने आता चंद्रपूर आणि गडचिरोलीसाठी २७ एप्रिलला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.



'मराठवाड्यात आणि मध्य महाराष्ट्रात देखील मिश्र वातावरण असणार आहे. या प्रदेशात उष्ण आणि दमट परिस्थिती असणार आहे. तसेच गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर आज दक्षिण कोकणात गडगडाटासह पाऊस येण्याची शक्यता आहे.' असेही होसाळीकर यांनी नमूद केले.

तर २८ एप्रिलला विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोलीत यलो अलर्ट असणार आहे. तर भंडारा आणि गोंदियाला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भवासीयांना उन्हाळा तीव्र झळा बसत आहेत. दुपारच्या सुमारास घराच्या बाहेर जाणे जीवावर येते. ही स्थिती असते मे महिन्यात. मात्र, यावर्षी एप्रिल महिन्यातच ही उष्णता नकोशी झाली आहे. दुपारच्या वेळेस रस्ते ओस पडल्याचे दिसून येत आहे. अशात पावसाचा इशारा देण्यात आल्याने विदर्भवासीयांना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. परंतु शेतकऱ्यांनी शेतीपिकांची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे.

## संपादकीय....

### युद्ध सज्जता

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहेत. भारत आता पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर देण्याच्या तयारीत दिसत आहे. हायपरसोनिक शस्त्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ॲडव्हान्स्ड स्क्रॅमजेट कनेक्टेड टेस्ट फॅसिलिटीची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. याआधी गुरुवारी भारतीय नौदलाने अरबी समुद्रात या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली होती. हैदराबादस्थित डीआरडीएल प्रयोगशाळेने हायपरसोनिक शस्त्र तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे . डीआरडीएलने २५ एप्रिल २०२५ला हैदराबाद मध्ये नव्याने निर्माण केलेल्या ॲडव्हान्स्ड स्क्रॅमजेट कनेक्टेड टेस्ट फॅसिलिटी (एससीपीटी) येथे १००० सेकंदांपेक्षा जास्त कालावधीसाठी ॲक्टिव्ह कूल्ड स्क्रॅमजेट सबस्केल कम्बस्टरची ग्राउंड टेस्टिंग केली. ही ग्राउंड टेस्टिंग जानेवारी २०२५ मध्ये १२० सेकंदांसाठी घेण्यात आलेल्या पूर्वीच्या चाचणीचा पुढील टप्पा आहे. आजच्या यशस्वी चाचणीसह ही प्रणाली लवकरच संपूर्ण ताकदीने कॉम्बस्टर चाचणीसाठी तयार होणार आहे. तत्पूर्वी, पहलगाम हल्ल्याच्या ४८ तासांच्या आत भारताने गुरुवारी युद्धनौका आयएनएस सुरतमधून क्षेपणास्त्राची चाचणी केली ज्यातून शत्रूंना कडक संदेश दिला आहे. नौदलाने मध्यम पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र डागले आहे. नौदलाच्या म्हणण्यानुसार, या काळात भारताचे स्वदेशी क्षेपणास्त्र विध्वंसक नौका आयएनएस सुरतने समुद्रात लक्ष्य गाठण्यात यश मिळवले आहे. या चाचणी दरम्यान, भारतीय नौदलाच्या नवीनतम स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र विनाशक आयएनएस सुरतने समुद्रात अचूकपणे हल्ला केला आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट कनेक्टिव्हिटी' निर्माण करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : भविष्यातील आव्हाने लक्षात घेता पर्यावरण पूरक आणि समृद्ध शहरांची निर्मिती गरजेची आहे. बहुपर्यायी वाहतूक व्यवस्थेसोबतच रोजगार निर्मितीवर भर, सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करावा. अशा शहरांच्या निर्मितीसाठी सिडकोची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट कनेक्टिव्हिटी' निर्माण करण्याचे निर्देश दिले. या विमानतळाला वॉटर टॅक्सीची सुविधा उपलब्ध करून द्यावी. अशी सुविधा असणारे हे देशातील पहिलेच आंतरराष्ट्रीय विमानतळ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सामान्य विमान वाहतुकीची व्यवस्था सर्वप्रथम निर्माण करण्याचे सूचित करीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जगभरातून लोक मुंबईमध्ये विमाने आणत असतात. त्यामुळे पार्किंगची चांगली सुविधा या विमानतळावर उपलब्ध असायला पाहिजे. यासोबतच विमान दुरुस्तीची सुविधाही विमानतळावर असावी. विमानतळाला रस्ते, रेल्वे, मेट्रो आणि जलवाहतुक 'कनेक्टिव्हिटी' ची कामे वेळेत पूर्ण करावीत.

**वॉटर टॅक्सीची सुविधा असणारे देशातील पहिले विमानतळ; नैना प्रकल्पाची गतीने अंमलबजावणी करावी**

नैना प्रकल्पाची अंमलबजावणी गतीने करण्यात यावी. या प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात येणारे रस्त्यांची रुंदी भविष्यातील वाहतुकीचा भार लक्षात घेऊन निर्धारित करण्यात यावी. भविष्यात सुरू होणाऱ्या आणि सद्यस्थितीत सुरू असलेल्या कामांचा कालावधी निश्चित करण्यात यावा. यापुढे पायाभूत सोयी सुविधा निर्मितीच्या कामांबाबत निविदेमध्येच कालावधीची सक्ती करण्यात यावी. आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असताना कुठलेही काम जास्त कालावधीसाठी रेंगाळणे योग्य नाही. त्यामुळे कामांचा कालावधी हा निश्चित करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

मेट्रो स्टेशन पासून विमानतळापर्यंत बहुपर्यायी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यात यावी. याबाबत नागरिकांची कुठलीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी. सिडकोच्या माध्यमातून सुरू असलेली कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करावी. घरकुल आणि गृहनिर्माणच्या बाबतीत कामे दर्जेदार करण्यात यावी. याबाबतही कालावधीची मर्यादा ठेवावी. नागरिकांना परवडणाऱ्या किमतीत घरे देण्यासाठी सिडकोने पुढाकार घेत कार्यवाही करावी. नवी मुंबई परिसरात क्रीडा सुविधांचे कामे सुरू आहे. त्यामुळे या भागामध्ये क्रीडा सुविधांचा चांगला विकास होत आहे.

खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचे काम पूर्ण करण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे सिडकोच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, अप्पर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, अप्पर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, सिडकोच्या सह व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.कमर्शियल कॉम्प्लेक्स, बिझनेस सेंटर आणि शॉपिंग मॉल समाविष्ट असलेले २७० हेक्टर जागेवर एरोसिटी, १५५ हेक्टर जागेवर आंतरराष्ट्रीय कार्पोरेट पार्क खारघर, ३८९ हेक्टर वरील इंटरग्रेटेड लॉजिस्टिक पार्क, १०२ हेक्टर जागेवर एज्युसिटी आणि १०५.५ हेक्टर जागेवर मेडिसिटी.

# पहलगाम दहशतवादी हल्यानंतर मदतकार्य; पर्यटकांना सुखरुप आणण्यासाठी भाजप आणि शिवसेनेची धडपड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना परत आणण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले. यामध्ये मुख्यमंत्र्यांनी ट्विट करत माहिती दिली होती की, आतापर्यंत तीन विशेष विमानाने पर्यटकांना सुखरुप आणण्यात आले आहे. परंतु दुसरीकडे शिवसेनेनेही असा दावा केला आहे की, त्यांच्या पक्षाकडून ४ विमानांची सोय करण्यात आली, ज्यामधून आतापर्यंत ५२० पर्यटकांना सुखरुप परत आणण्यात आले आहे. सत्ताधारी महायुतीतील दोन्ही पक्षांचे हे दावे पाहता पर्यटकांना परत आणण्यावरुन श्रेयवाद सुरु झाल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अधिकृत एक्स हँडलवर माहिती देण्यात आली की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्य सरकारने आयोजित केलेल्या विशेष विमानांची व्यवस्था केली जात आहे. आतापर्यंत ५०० पर्यटकांना राज्यात परत आणण्यात आले आहे. शिवसेना मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याचे श्रेय देत आहे. शिवसेनेच्या नेत्याचे म्हणणे आहे की, ५२० पर्यटकांच्या विमानाचा खर्च शिवसेनेने उचलला आहे. खुद्द एकनाथ शिंदेंनी या मदतकार्यात लक्ष घातले आहे. श्रीनगरहून ५२० प्रवाशांना परत आणले आहे.

यातच मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयीन निवेदनात नमूद करण्यात आले की, शुक्रवारी २३७ पर्यटकांची आणखी एक तुकडी महाराष्ट्रात दाखल होणार आहे. फडणवीस यांनी गुरुवारी कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांच्यासमवेत काश्मीरमधील परिस्थितीचा आढावा घेतला आहे. उर्वरित पर्यटकांना परत आणण्यासाठी अधिक विमानांची आवश्यकता भासल्यास राज्य सरकार खर्च उचलणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे.

दहशतवादी हल्ल्यानंतर राज्य सरकारने काश्मीरमधील पर्यटकांना परत आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु केले होते. खुद्द मुख्यमंत्री यांनी यात लक्ष घातले आणि स्थानिक प्रशासनाशी देखील संपर्क साधला, असे म्हटले जाते. त्यानंतर बुधवारी फडणवीस यांनी काश्मीर स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधण्यासाठी गिरीश महाजन यांची नियुक्ती केली आहे.

हल्ल्यानंतर पर्यटकांना परत आणण्यासाठी दोन्ही पक्षांकडून स्वतंत्र प्रयत्न केले जात आहेत, असे चित्र आहे. सरकारने बुधवारी जाहीर केले की, हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांचे मृतदेह राज्यात आणले गेले तेव्हा कॅबिनेट मंत्री आशिष शेलार आणि मंगल प्रभात लोढा मुंबई विमानतळावर समन्वयासाठी होते. तर पुण्यातील जबाबदारी माधुरी मिसाळ यांच्याकडे सोपवण्यात आली होती.

दुसरीकडे शिवसेनेने आपले मंत्री गुलाबराव पाटील आणि योगेश कदम यांना मुंबई विमानतळावर तैनात केले होते. पर्यटकांना परत आणण्याच्या समन्वयासाठी शिंदे स्वतः बुधवारी श्रीनगरला रवाना झाले आणि त्यांनी दोन दिवस तिथेच तळ ठोकला होता.

दोन्ही पक्षांच्या या स्वतंत्र व्यवस्थेवर विरोधी पक्षाने आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी सांगितले की, सत्ताधारी आघाडीतील लोक स्वतःचा प्रचार करत आहेत आणि पहलगाममधील भयानक दहशतवादी हल्ल्यासारख्या घटनांनाही ते सोडत नाहीत.

# प्लान ए , प्लान बी, ३५ बंदुका! कोडमध्ये बोलणारा, धर्म विचारणारा 'तो' संशयित खेचरवाला ताब्यात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर: जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा हकनाक बळी गेला. त्यानंतर आता काश्मीरमध्ये वेगवान घडामोडी सुरु आहेत. गोळीबार करुन फरार झालेल्या दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे. दुसरीकडे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोची दखल घेत गांदरबल जिल्ह्यातील पोलिसांनी संशयित खेचरवाल्याची ओळख पटवली आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. एका महिला पर्यटकाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हा प्रकार समोर आला. तिनं एका संशयित व्यक्तीचा फोटो दाखवला. या व्यक्तीनं आपल्याला धर्माशी संबंधित प्रश्न विचारल्याचा दावा तिनं केला.

गांदरबल पोलिसांनी सुत्रं फिरवत वेगानं तपास केला आणि संशयिताला ताब्यात घेतलं. संशयिताची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आलं आहे. अयाज अहमद असं त्याचं नाव आहे. तो गोहिपोरा रैजनचा रहिवासी आहे. हा भाग गांदरबल जिल्ह्यातच येतो. अयाज अहमद सोनमर्ग ते थाजवास ग्लेशियर मार्गावर खेचर चालक म्हणून काम करतो. पोलिसांनी अहमदची चौकशी सुरु केली आहे. या प्रकरणात कायदेशीर प्रक्रियादेखील सुरु करण्यात आली आहे. जौनपूरच्या रहिवासी असलेल्या एकता तिवारी २० एप्रिलला बैसरण खोऱ्यात फिरायला गेल्या होत्या. त्यावेळी स्केचमध्ये दिसत असलेल्या संशयितानं आपल्याला खेचरावरुन फिरवून आणलं होतं, असा दावा तिवारींनी केला आहे. 'संशयित व्यक्ती त्यावेळी अजब प्रश्न विचारत होता. त्यात धर्म, धार्मिक स्थळांचा प्रवास, मित्रांची धार्मिक ओळखींशी निगडित प्रश्नांचा समावेश होता,' असं तिवारींनी सांगितलं. त्यांनी त्यांच्या मोबाईलमधील एक फोटो आणि व्हॉट्स ॲप ग्रुपमधील स्क्रीनशॉटही दाखवले. त्यातील तिच्या एका मित्रानंही संशयिताला ओळखलं.

खेचरवाल्याला २० एप्रिलला एक फोन आला होता, असा दावा एकता तिवारींनी केला. 'त्या फोन कॉलवर प्लान ए आणि प्लान बीसारख्या सांकेतिक भाषेत बोलत होता. प्लान ए ब्रेक फेल, प्लान बी-३५ बंदुका मी पाठवल्या आहेत. गवतात लपवल्या आहेत, असं तो फोनवर बोलत होता. मी त्याचा संवाद ऐकत असल्याचा संशय त्याला आला. मग त्यानं स्थानिक भाषेत बोलण्यास सुरुवात केली,' असं तिवारी म्हणाल्या.

# नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग' साठी शहरी परिवहन सेवेत आमूलाग्र बदल करावेत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**ई शहरांमधील परिवहन सेवेच्या विकासासाठी स्वतंत्र एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण**

**ई प्राधिकरण स्थापन करण्याचा कायदा करण्यापूर्वी हरकती, सूचना मागवा**

मुंबई, दि. २५: महानगरांमध्ये वाहतुक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. यामध्ये किफायतशीर सहज आणि सुलभरित्या उपलब्ध होणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावित आहे. नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग'साठी शहरी परिवहन सेवेमध्ये आमूलाग्र बदल आवश्यक आहे. त्यासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण (युनिफाईड मेट्रोपॉलिटीन ट्रान्सपोर्ट अथॉरिटी) स्थापन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या प्राधिकरणाचा कायदा करण्यापूर्वी त्यावर जनतेच्या सूचना व हरकती घेऊन अंतिम निर्णय घेण्याचेही त्यांनी सूचित केले.



मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, सध्या वेगवेगळ्या महानगरनगरांमध्ये महापालिका, राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे, मेट्रो आदी यंत्रणांच्या माध्यमातून परिवहन सेवा कार्यान्वित आहेत. प्रवासीभिमुख परिवहन सेवेसाठी सुसूत्रीकरण असणे गरजेचे आहे. महानगरांमधील परिवहन सेवेच्या विकास व विस्तारासाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण स्थापन करणे गरजेचे आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध परिवहन सेवांचे एकच भाडे, शहरांमध्ये सुरू असलेले परिवहन प्रकल्प आदींबाबत समन्वय साधणे सोयीचे होईल.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रभावी कामकाजासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतंत्र पद असावे. (पान ४ वर...)

# सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंमलबजावणीबद्दल मुख्यमंत्र्यांकडून अधिकाऱ्यांचे अभिनंदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या आतापर्यंतच्या अंमलबजावणीबद्दल मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मुंबईत ऊर्जा खात्याच्या अधिकाऱ्यांचे तसेच जिल्हाधिकारी आणि सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीस अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डिकर, राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव (महसूल) राजेश कुमार, प्रधान सचिव (ग्रामविकास) एकनाथ डवले, मा. मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे व सचिव श्रीकर परदेशी, महावितरणचे संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी तसेच सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी योजनेच्या अधिक गतिमान अंमलबजावणीसाठी तयार केलेल्या सिंगल विंडो पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी योजनेच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय व तांत्रिक अडचणींचा आढावा घेतला आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्राधान्याने अडचणी दूर करण्याची सूचना केली.



सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील विलंबाबद्दल तक्रार केली जाते. तथापि, अचूक धोरण आणि निश्चित अंमलबजावणी असेल तर सरकारी योजनासुद्धा गतीने अंमलात आणली जाते याचे ही योजना उदाहरण आहे, असे ते म्हणाले.

या योजनेच्या अंतर्गत राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्याच्या आधारे सर्व कृषी फीडर चालविण्यात येणार आहेत. आतापर्यंत राज्यात १३५९ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प पूर्ण झाले असून त्यामुळे २ लाख १४ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होऊ लागला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १५,२८४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे काम चालू आहे. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचा हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे.

सध्या शेतकऱ्यांना कृषीपंपांसाठी दिवसा आणि रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरठा होतो. केवळ दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी या योजनेमुळे पूर्ण होणार आहे. सप्टेंबर २०२६ पर्यंत योजनेची अंमलबजावणी पूर्ण होईल.

मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये या योजनेचा शुभारंभ झाला. त्यानंतर अल्पावधीत सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठी ४० हजार एकर जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठीची टेंडर काढून खासगी विकासकांना कार्यादेश देणे, नव्याने निर्माण होणारी वीज कृषी पंपांपर्यंत कार्यक्षमतेने पोहचविण्यासाठी वीज जाळे बळकट करणे अशी कामे गतीने सुरू आहेत. या योजनेत सुमारे ६५ हजार कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक होणार आहे व ग्रामीण क्षेत्रात ७०,००० रोजगार उपलब्ध होणार आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये महावितरणला सरासरी तीन रुपये प्रती युनिट इतक्या किफायतशीर दरात वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कृषी पंपांना मोफत वीज देण्यासाठी राज्य सरकारकडून द्याव्या लागणाऱ्या अनुदानात मोठी कपात होईल. तसेच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणे शक्य होणार आहे. एकूणच कृषी आणि उद्योग क्षेत्रांसाठी ही गेमचेंजर योजना आहे. केंद्र सरकारने या योजनेची प्रशंसा केली असून अन्य राज्यांना तिचे अनुकरण करण्याची सूचना केली आहे. या योजनेसाठी महावितरणला इंडियन स्मार्ट ग्रीड फोरमचा राष्ट्रीय पुरस्कार, स्कोच वॉर्ड असे राष्ट्रीय स्तरावरील सुमारे २० पुरस्कार मिळाले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# तातडीने पंढरपुरातील चंद्रभागेच्या वाळवंटात आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करा, यामध्ये कोळी समाजातील पट्टीचे पोहणारे तरुण घ्या ! : गणेश अंकुशराव

## किमान २४ तरुणांची याठिकाणी सुरक्षा रक्षक म्हणून नेमणूक करावी अशी मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : चंद्रभागेच्या पात्रात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन कक्ष निर्माण करून यामध्ये आदिवासी महादेव कोळी जमातीच्या पट्टीच्या पोहता येणाऱ्या तरुणांचा समावेश करावा. अशी मागणी महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी प्रशासनाला निवेदनाद्वारे केली आहे.

नुकत्याच चंद्रभागेच्या पात्रात बुडून तीघांचे बळी गेले असुन आजही एका मुलीने नदीत उडी घेतल्याने ती बुडाली आहे, या आधीही अनेक निष्पाप वारकरी भाविक आणि पंढरपुरातील स्थानिक नदीत बुडून मृत्युमुखी पडले आहेत. या सर्व घटनांमध्ये आदिवासी महादेव कोळी जमातीच्या तरूणांनीच शोधकार्यात सहभागी होऊन बुडालेल्या कित्येकांची प्रेतं नदीतुन बाहेर काढले आहेत तर बुडताना अनेकांचे प्राणही वाचवले आहेत.

**आत्तापर्यंत चार ते पाचजण नदीत बुडून मृत्युमुखी पडले आहेत, येत्या काळात आषाढी वारी भरणार आहे, त्यामुळे आता तरी मंदिर समिती नं नदीपात्रात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करावी, लाईटची, बोटींगची व कोळी समाजातील पोहण्यात तरबेज असलेले किमान २४ तरुणांची याठिकाणी सुरक्षा रक्षक म्हणून नेमणूक करावी अशी मागणी गणेश अंकुशराव यांनी केली आहे.**

मुळात नदीपात्रात अशा घटना घडूच नये आणि कोणी बुडाले तर तातडीने त्यांना वाचवण्यासाठी नदीच्या पात्रात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची निर्मिती मंदिर समिती मार्फत करावी आणि यामध्ये आदिवासी महादेव कोळी जमातीच्या पट्टीच्या पोहणाऱ्या तरुणांचा सहभाग





करावा. अशी विनंती गणेश अंकुशराव यांनी या निवेदनात केली आहे.

याबाबत आम्ही गेल्या कित्येक वर्षांपासून सातत्याने मागणी करत आहोत. मा. जिल्हाधिकारी यांचेकडेही एका निवेदनाद्वारे आम्ही मागणी केली आहे.

तरी आपण परिस्थिती चे गांभीर्य ओळखून तातडीने मंदिर समिती ची बैठक घेऊन व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री. आमदार, खासदार यांचेशी चर्चा करून अशाप्रकारची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करून यामध्ये कोळी समाजातील तरुणांची नेमणूक करावी. असंही गणेश अंकुशराव यांनी म्हटलं आहे.

## थोडक्यात...




### विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर : माहेरून वार्शिंग मशीन घेण्यासाठी पैस घेऊन ये नाही तर तुला नांदविणार नाही असे म्हणत मानसिक व शारीरिक छळ केल्याची घटना सहा फेब्रुवारी २०२० ते आजपर्यंत शिवाजीनगर मोदी सात रस्ता येथे घडली. याप्रकरणी आयेशा आसिफ नदाफ (वय २८, रा. गणेश नगर, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती आसिफ सैफन नदाफ सासरे सैफन नदाफ, सासू राजमा नदाफ, दीर तौसिफ नदाफ (सर्व रा. शिवाजी नगर, मोदी सात रस्ता) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी आयेशा नदाफ या सासरी नांदताना यातील संशयित आरोपींनी मिळून फिर्यादीस मानसिक छळ करून घालून पाडून बोलून अपमानास्पद वागणूक दिली. तसेच माहेरून वार्शिंग मशीन घेण्यासाठी पैसे आण नाही तर तुला नांदविणार नाही असे म्हणून जाचहाट केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### हँडल लॉक करून ठेवलेली बुलेट पळविली

सोलापूर : घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली बुलेट क्रमांक एम एच १३ सीएम ४७६७ ही चोरून नेल्याची घटना मंगळवारी दि.२२ घडली. याप्रकरणी बीपीन गुणवंत कारभारी (वय २८, रा. होमकर नगर, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा निफाडचा तीव्र निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : जम्मु-काश्मीर मधील पहलगम अतिरेकी हल्लात निरपराध नागरिकांच्या हत्येचा तीव्र निषेध करण्यासाठी आज. २५. रोजी सकाळी ११ वा निफाडचे प्रांतधिकारी व तहसीलदार यांना डॉक्टर्स असोसिएशन तर्फे निवेदन देण्यात आले यात म्हटले आहे की जम्मु-काश्मीर मधील पेलगम येथे निरपराध नागरिकांवर गोळीबार करून २८ जणांचा मृत्यु झाला अनेकजण जखमी झाले.

या अतिरेकी हल्लयास जबाबदार दहशतवाद्यांना कठोर शिक्षा व्हावी व पुन्हा असा भ्याड हल्ला होणार नाही यासाठी कडककारवाई करून त्यांना व त्यांच्या आकांना कायम चा धडा शिकवीला जावा.

निरपाराध नागरिकांच्या मृत्यूने अनेक कुटुंबियांचे कर्ते पुरुष गमाविले त्या प्रत्येक कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या प्रति संवेदना....

या निर्णायक प्रसंगी भरत सरकारच्या कोणत्याही निर्णयासोबत आम्ही सदैव तयार आहोत असे नमूद करण्यात आले आहे या वेळी यावेळी डॉ. उत्तमराव डेर्ले. (अध्यक्ष:-निफाड तालुका डॉक्टर्स असोसिएशन) रोहित धोक्राट (उपाध्यक्ष:-निफाड डॉक्टर्स असो). विलास नाठे. रुपेश वाघ. सुनील कापसे. अरुण कातकाडे. अमोल पवार. मकरंद कुलकर्णी. सीमा डेर्ले.सचिन ढेमसे आदी उपस्थित होते.

# गट विकास अधिकाऱ्यांच्या आदेशाचे अवमान केल्यामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यास निलंबित करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : प्रतिनिधि , सुधाकर रणदिवे,धाराशिव तालुक्यातील ग्रामपंचायत मौजे जवळे दुमाला येथील तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती.डांगे.पी.एम यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे अनुपालन न केल्यामुळे त्यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांना निलंबित करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य लखन वाघमारे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती धाराशिव यांचेकडे केली आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिनांक१९/०४/२००४ रोजी लखन वाघमारे यांनी ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती डांगे.पी.एम यांच्याकडे विनंती अर्ज करून ग्रामपंचायतच्या हद्दीत अथवा रस्त्यावरील विविध प्रकारच्या अतिक्रमणाच्या नोंदी घेण्याबाबत दिनांक २२/०३/२०२४ रोजी केलेल्या विनंती अर्जावरुन ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती, माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे मागितलेली माहिती ३० दिवसाच्या आत देणे बंधनकारक आहे परंतु ग्राम पंचायत अधिकारी यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून माहिती देण्यास टाळाटाळ केली त्यामुळे वाघमारे यांनी विस्तार अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले विस्तार अधिकारी यांनी २४ जून २०२४ रोजी सुनावणी घेऊन त्यांना ७ दिवसात मागितलेली माहिती द्यावी असा लेखी आदेश दिला होता तरीही ग्राम पंचायत अधिकारी श्रीमती डांगे.पी.एम यांनी विस्तार अधिकारी यांच्या आदेशालाही न जुमानता माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली त्यामुळे दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी गट विकास अधिकारी यांच्याकडे तशी तक्रार करून संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना निलंबित करण्याची मागणी केली होती, दिलेल्या तक्रारी अर्जावरुन गटविकास अधिकारी श्री.रा.वि.चकोर यांनी दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी श्रीमती डांगे पी.एम यांना मागितलेली माहिती पुरविणे बाबत आदेश दिला होता, संबंधितास माहिती न दिल्यास योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असेही बजावले होते परंतु श्रीमती डांगे यांनी गटविकास अधिकाऱ्याच्या आदेशालाही जुमानले नाही, त्यामुळे वाघमारे यांनी दि.२०/०४/२०२५ रोजी पुनश्च ही बाब गटविकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देऊन ग्रामपंचायत अधिकारी यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना सेवेतूने निलंबित करण्याची मागणी केली आहे, त्यानुसार गटविकास अधिकारी श्री.रा.वि.चकोर हे ग्राम पंचायत अधिकाऱ्याविरुद्ध प्रशासकीय कारवाई करतात की नाही याकडे वाघमारे यांचे लक्ष वेधले आहे.

# कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे सन २०२५-२६ मधील कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षणाची तुकडी क्र. १ चे पशुधन विकास अधिकारी गट-अ, नेहरू नगर सोलापूर डॉ. स्नेहंका बोधनकर, यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सदर प्रसंगी प्रशिक्षणार्थ्यांमधून वसंत व्हनमाने, रा. गोटेवाडी ता. मोहोळ व तसेच प्रविण जगताप, रा. सोहाळे ता. मोहोळ यांनी सदर प्रशिक्षणामधून स्वयंरोजगार निर्मितीसाठी कुक्कुटपालन व्यवसाय फायदेशीर असून याबाबत सखोल असे मार्गदर्शन मिळाल्याबाबत आभार व्यक्त केले. सदर प्रशिक्षणास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. सधन कुक्कुट विकास गट चे प्रमुख डॉ. नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी गट-अ यांनी प्रशिक्षणाची यशोगाथा विषद केली . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी एस. पी. माने, यांनी केलेअसून सदर प्रशिक्षणाची तुकडी दि. २१ एप्रिल २०२५ ते २५ एप्रिल २०२५ या कालावधीत संपन्न झालेली असून सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जमादार यांनी परिश्रम घेतलेले आहेत. तरी पुढील तुकडीस जिल्ह्यातील पशुपालकांनी तसेच महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून परसातील कुक्कुटपालन व्यवसायास चालना मिळण्यासाठी नोंदणी करून लाभ घ्यावा असे आवाहन पशुधन विकास अधिकारी गट-अ डॉ. स्नेहंका बोधनकर, यांनी केले आहे.

# तुळजापूर विभागात महावितरणचा उमरगा उपविभाग ठरला सर्वोत्कृष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : महावितरणच्या तुळजापूर विभागात उमरगा उपविभागाने मार्च २०२४-२५ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत सर्वोत्कृष्ट उपविभाग म्हणून प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला आहे.




महावितरणच्या तुळजापूर विभागीय कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या कर्तव्यदक्ष कर्मचारी गुणगौरव सोहळा कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंता श्री. नंदकुमार काळे यांच्या हस्ते उमरगा शहर शाखेला उत्कृष्ट ग्राहक सेवा, वीजबिल थकबाकी वसुली व सर्वांगीण कामगिरीसाठी गौरविण्यात आले.

उमरगा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. सचिन रेकूलवाड यांना ऊर्जा शिरोमणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर उमरगा शहर शाखेचे शाखा अभियंता श्री. औदुंबर मोरे यांना वीजबिल वसुलीतील उत्कृष्ट योगदानासाठी ऊर्जारत्न पुरस्कार देण्यात आला. याचप्रमाणे, शाखेतील श्रीमती अंजली घोडके यांना ऊर्जामित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित सर्व उमरगा उपविभागातील कर्मचारी व अधिकारी यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिव मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. संजय आडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, शाखेतील प्रधान तंत्रज्ञ श्री. राऊत, वरिष्ठ तंत्रज्ञ श्री. शाम आबाचणे, श्री. अमोल पाटील, श्रीमती अंजली घोडके तसेच लाईनमन वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या यशामुळे उमरगा उपविभागाने संपूर्ण तुळजापूर विभागात आपली वेगळी छाप उमटवली असून, सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## माऊली हळणवर यांची पालकमंत्री जयकुमार गोरे यांचेकडे मागणी

# अरण ते पंढरपूर हा रस्ता पालखी मार्गात समाविष्ट करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आज अरण येथे संत सावता माळी चंदन उटी कार्यक्रमासाठी ग्रामविकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आले असता भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली भाऊ हळणवर यांनी निवेदन दिले की संत सावता माळी यांच्या भक्तीसाठी स्वतः विठ्ठलाने त्यांच्या आरण येथील शेतामध्ये जाऊन दर्शन दिले होते पंढरपूर कडे अनेक संतांच्या पालख्या येतात राज्य सरकारने हे सगळे पालखी मार्ग चौपदरीकरण केलेलं असून संत सावता माळी यांच्या भेटीसाठी पांडुरंगाची पालखी आरण येथे




जात असते परंतु आरण कडे जाणारा रस्ता एकेरी असल्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होते प्रत्येक वारीच्या वेळेस भाविक प्रचंड संख्येने आरण येथे दर्शनासाठी येत असतात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी आरण या तीर्थक्षेत्राला अ दर्जा देऊन १०० कोटी निधी जाहीर केला असून एक मोठे विकासाचे काम येथे होणार आहे आरणला येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता हा रस्ता अपुरा पडणार आहे म्हणून आरण ते पंढरपूर या रस्त्यात चे पालखी मार्गात रूपांतर करून हा रस्ता चौपदरीकरण करावा अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली यावेळी माऊली भाऊ हळणवर भाजपा करकंब मंडलाध्यक्ष हर्षद कदम संजय लवटे सर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# रविवारी स्वेरीत 'जागतिक पशुवैद्यक' दिनानिमित्त कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये रविवार, दि.२७ एप्रिल २०२५ रोजी ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान तर्फे 'जागतिक पशुवैद्यक दिन' साजरा करण्यात येणार आहे.' अशी माहिती ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे यांनी दिली.

या कार्यक्रमाअंतर्गत सकाळी ९ वा. नोंदणी व अल्पोपहार, स.९.३० वा व्हेट्रिना हेल्थ केअरचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश घाडीगावकर हे 'किफायतशीर दुग्ध व्यवसायासाठी पशुवैद्यकापुढील आव्हाने' या विषयावर तसेच स.१० वा. मुंबई मधील जिओ प्लॅटफॉर्मचे महाव्यवस्थापक डॉ. संतोष वाघचौरे हे 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा फायदेशीर दुग्ध व्यवसायासाठी वापर' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पशुसंवर्धन विभागाचे माजी सहआयुक्त डॉ. महेश बनसोडे हे राहणार आहेत. त्यानंतर स्व. डॉ. सुहास

**पंढरपुरच्या ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचा उपक्रम**

देशपांडे जीवन गौरव व स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्काराचे वितरण पशुसंवर्धन अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे व स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या हस्ते होणार असून यासाठी पशुसंवर्धन पुणे विभागाचे सहआयुक्त डॉ. समीर बोरकर हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या कार्यक्रमासाठी पुणे पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. अंकुश परिहार, सातारा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. दिनकर बोर्डे, सोलापूर पशुसंवर्धन विभागाचे प्रभारी उपायुक्त डॉ. विशाल येवले, सोलापूरचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे, सांगलीच्या पशुधन विभागाचे सहा.आयुक्त डॉ. विजय ढोके, सोलापूर पशुधन विभागाचे सहा. आयुक्त डॉ. भास्कर पराडे यांच्यासह इतर मान्यवर या भव्य व दिव्य अशा कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे, सचिव डॉ. अनिल सरदेशमुख व मार्गदर्शक डॉ. टी.एन. बेले त्यांच्यासह ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमासाठी प्रायोजक म्हणून महाव्हेट सोलापूरचे अध्यक्ष डॉ. शहाजी ठवरे, पंचायत समिती पंढरपुरचे पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ. प्रियांका जाधव-कोळेकर व पंढरपूरच्या पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. विलास डोईफोडे हे लाभले आहेत. स्व.सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्कार हा पुरस्कार विजेते पशुसंवर्धन विभागाचे माजी सहसंचालक डॉ. सी.आर. कापडी यांना देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील सर्व पशुधन विकास अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात सुरक्षतेच्या दृष्टीने उपाययोजना

## मोबाईल बंदीची कडक अंमलबजावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या सुरक्षततेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

मंदिर समितीच्या निर्णयानुसार व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या सूचनेनुसार श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात प्रवेश करणा-या प्रवेशद्वारावर सुरक्षततेच्या दृष्टीकोनातून सर्व तपासणी तसेच मंदिरात मोबाईल व कॅमेरा सदृश्य प्रवेश बंदीची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्व कर्मचा-यांना ओळखपत्र परिधान करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

कर्मचा-यांना मंदिरात प्रवेश करणे व बाहेर पडण्यासाठी फक्त व्हिआयपी गेटचा वापर करण्यात येत आहे.

मंदिरात मोबाईल व कॅमेरा घेऊन जाण्यास बंदी असून, त्याची कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे. भाविकांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने मंदिर समिती मार्फत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असल्याचेही यावेळी श्रोत्री यांनी सांगीतले.



## थोडक्यात...

### पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ

सोलापूर : हैदराबाद रोड दहिटने येथे माहेरून म्हशीच्या व्यवसायासाठी पाच लाख रुपये घेऊन ये नाहीतर तुला नांदविणार नाही असे म्हणून मानसिक व शारीरिक छळ केल्याची घटना २० मे २०२४ ते आजपर्यंत सासरी घडली. याप्रकरणी विजयालक्ष्मी सिद्धेश्वर गव्हाणे (वय २५, रा. कमल नगर, नागरी बँक कॉलनी, हैदराबाद रोड) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती सिद्धेश्वर, सासरे नवनाथ, सासू रत्नमाला, दीर सागर (सर्व रा. दहिटणे, बालाजी मंदिर जवळ, हैदराबाद रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी विजयालक्ष्मी गव्हाणे या सासरी नांदताना यातील संशयित आरोपींनी मिळून फिर्यादीत मानसिक छळ करीत घालून फाडून बोलून अपमानास्पद वागणूक दिली. माहेरून म्हशीच्या व्यवसायासाठी पाच लाख रुपये नाहीतर तुला नांदविणार नाही असे म्हणून जाचहाट केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिवपदी रमझान शेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षा-चे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने व पक्षाचे विधिमंडळ गटनेते डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई विभागातील खारघर येथील रमझान शेख यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुख्यालय पाचपाखाडी ठाणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव ही महत्वा-ची जबाबदारी देत नियुक्ती करण्यात आली आहे.



आपल्या पक्षाचे आधारस्तंभ शरदचंद्र पवार यांनी देशासाठी आणि महाराष्ट्रासाठी केलेल्या कार्यांमधून प्रेरणा घेऊन तसेच जितेंद्र आव्हाड यांची राजकारणातील स्पष्ट भूमिका, जनसामान्यासाठी असलेली त्यांची आपुलकी यातून प्रेरणा घेऊन पक्षासोबत राहून जनसेवेसाठी जीवन अर्पित करण्याचे निर्धार करतो. तसेच पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी रमझान शेख यांनी दिली.

याप्रसंगी ठाणे शहर जिल्ह्याचे अध्यक्ष सुहास भाई देसाई आणि खारघर विभागातील कार्यकर्ते अमीर शाह मिरु, जावेद सय्यद,वाजिदशेख,अश्रफ खान तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करून 'बेस्ट' व्हावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ई बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट)आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतील नागरिकांची जीवनवाहिनी म्हणून 'बेस्ट'ची ओळख आहे. नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर, आरामदायी होण्यासाठी 'बेस्ट'ने अत्याधुनिक बस आणि प्रभावी सोयीसुविधा पुरविण्यासोबत स्वत:चे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, सहपालकमंत्री ड आशिष शेलार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, 'बेस्ट'चे महाव्यवस्थापक एस. व्ही. आर श्रीनिवास आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईतील नागरिकांना प्रवास करताना जास्त ताटकळत थांबावे लागू यासाठी नियोजन करावे. बसच्या संख्या वाढविण्यासोबत बस किती वेळात येणार, सध्या कुठे आहे, याची माहिती प्रवाशांना होण्यासाठीच्या यंत्रणेची त्वरित अंमलबजावणी करावी. बांद्रा, दिंडोशी आणि देवनार बस डेपोंचा पुनर्विकास करताना जागा भाडेतत्वावर देताना धोरण ठरवावे. त्याठिकाणी व्यावसायिक गाळे, रहिवास आणि बेस्ट बस आगार अशा पद्धतीने रचना केल्यास बेस्टचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. मुंबईतील छोटे, अरूंद रस्ते पाहता अत्याधुनिक छोट्या बस घ्याव्यात. यासाठी केंद्र सरकारकडून येणाऱ्या एन कॅम्पच्या (नॅशनल क्लिन एअर पॉलिसी) निधीचा वापर करावा.

मुंबईमध्ये लोकल रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि बससाठी सार्वजनिक वाहतूक प्रणाली एका सिंगल मोबिलिटी प्लॅटफॉर्मवर आणण्याची प्रणाली तयार होत आहे. यातून नागरिकांना एकाच तिकिटामध्ये प्रवास करता येणार असल्याने बेस्टला याचाही फायदा होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पाच बस डेपोच्या ठिकाणी मराठी सिनेमा थिएटर

बस डेपोंचा पुनर्विकास करताना करमणूक केंद्राचाही विचार करण्याबाबत सहपालक मंत्री श्री. शेलार यांनी सूचना केल्या. मराठी सिनेमाला उर्जितावस्था येण्यासाठी पाच ठिकाणी मराठी सिनेमा थिएटरची निर्मिती केल्यास यातूनही उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

'मनपा'च्या बजेटमध्ये निधीची तरतूद

'बेस्ट'वरील खर्चाचा भार कमी करण्यासाठी प्रत्येक वर्षी मुंबई महानगरपालिका मदत करते. मात्र 'मनपा'च्या बजेटमध्ये तीन टक्के वाहतुकीसाठी राखीव तरतूद केली तर याचा 'बेस्ट'ला फायदा होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी बेस्टचे व्यवस्थापक श्री. श्रीनिवास यांनी टोल माफ करावेत, कर्मचाऱ्यांच्या देण्यापोटीची १६५८ कोटी मिळावेत. सरकारी कर माफ करण्याची मागणी केली. याबाबत प्रस्ताव सादर करावेत, शासन याचा सकारात्मक विचार करेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

छोट्या गाड्यांचा प्रस्ताव तयार करा- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, नागरिकांच्या सोयीसाठी मेट्रो स्टेशन आणि बेस्ट बसच्या मार्गाचे नियोजन करावे. यासाठी छोट्या अत्याधुनिक बसचा प्रस्ताव तयार करावा. नागरिकांच्या करानुसार सोयीसुविधा पुरविण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या. मुंबई शहरात बेस्टच्या विविध ठिकाणी जागा आहेत, त्यातूनही उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत.

बेस्टच्या वातानुकूलित बसचे उद्घाटन

बेस्टच्या ताफ्यात ५०३ वातानुकूलित आणि पूर्ण इलेक्ट्रिकल बस दाखल झाल्या आहेत. यातील विक्रोळी ते मुंबई सेंट्रल या बसला हिरवी झेंडी दाखवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मुंबईसाठी २,१०० वातानुकूलित बसची खरेदी करण्यात आली असून यातील ५०३ बस मिळाल्या असून आणखी २,४०० बस मागविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# निफाड येथे मोफत आरोग्य शिबिराचा घेतला रुग्णांनी लाभ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले ,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने जयहिंद लोकचळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती निफाड व एसएमबीटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड व परिसरातील व रुग्णांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन निफाड येथील सुप्रसिद्ध साई हॉस्पिटलचे संचालक डॉ.रोहित धोकरट यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, महामानवांच्या जयंती करत असताना समाज उपयोगी उपक्रम राबवणे गरजेचे असते या रुग्णसेवेच्या माध्यमातून तरुणांनी राबविलेला हा उपक्रम नक्कीच समाजासाठी आदर्शवत आहे. यावेळी महामानवांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन खडताळे व सहकाऱ्यांच्या वतीने मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक जावेद शेख, तन्वीर राजे, काशिनाथ हिरे, हेमंत खडताळे, दिलीप पगारे, विजयकुमार गजभिये, बाजीराव गायकवाड, जयदीप कुंदे, गणपत ढोमसे, सागर निकाळे, स्वप्नील बिनायकिया, अशोक पगारे, नंदकिशोर कापसे, नूर शेख, रामदास जमधडे, अशोक खडताळे, देवा गांगुर्डे, प्रवीण तनपुरे, राजू मनोहर, सचिन निकाळे, विकास खडताळे, प्रदीप खडताळे, कैलास वाकडे, सतीश भालेराव, हर्षल जगताप, दुर्योधन गांगुर्डे, शुभम पगारे, दुर्गेश वाघ,लखन खडताळे, अनिकेत साळवे, आदींसह रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले. डॉ. अरुण चौधरी, डॉ. यश साळवे, डॉ.सानिका अग्रवाल, दीपिका साबळे, प्राची सोनवणे, सचिन आडके, संदीप गायकवाड, संदीप पाचोरकर, प्रफुल भालेराव यांचे आरोग्य पथक उपस्थित होते. आरोग्य शिबिराचे समन्वयक म्हणून सचिन आडके यांनी काम बघितले.

# दिव्यांग उमेदवारांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र अनिवार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाने २७ जून २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व दिव्यांग उमेदवारांना केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरून वितरित होणारे दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी कार्ड) अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व भरती प्रक्रियेत १ मे २०२५ पासून करण्यात येणार आहे.

**१ मे पासून नव्या अटींची अंमलबजावणी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीत दिव्यांग उमेदवारांसाठी त्यांच्या खात्यात युडीआयडी कार्ड क्रमांक नोंदविण्याची व त्यास स्वावलंबन पोर्टलवरून वैधता मिळविण्याची सुविधा आधीच उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उमेदवारांकडे जर स्वावलंबन पोर्टलचे दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड दोन्ही असतील, तर ते तपशील खात्यात नोंदवणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि राज्य शासनाच्या एसएडीएम पोर्टलवरुन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे. अशा उमेदवारांनी एसएडीएम प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (एपीश्राशपीं र्छीलशी) अनिवार्य असेल तथापि उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल.



उमेदवाराचे नाव, दिव्यांगत्वाचा प्रकार, स्थिती इत्यादी तपशील पडताळल्यानंतरच माहिती वैध ठरवली जाईल. खात्यातील आणि युडीआयडी कार्डवरील जन्मदिनांक एकसारखे असणे आवश्यक आहे.

कोणत्याही जाहिरातीसाठी अर्ज करताना दिव्यांग तपशील वैध असल्याशिवाय अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे सर्व दिव्यांग उमेदवारांनी ही प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण करावी, असे आवाहन आयोगाने केले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समजून घेण्याची गरज

## आठवणींना दिला उजाळा

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर कुरुंद येथे भीम जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महामानवांचा विचारांचा रथ पुढे नेण्यासाठी, वारसा जपण्यासाठी, त्यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी भिवंडी तालुक्यील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर कुरुंद येथे ग्रामस्थांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

**पडघा हे ऐतिहासिक गाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात आले होते. त्या आठवणींना उजाळा कवी, पत्रकार मिलिंद जाधव यांनी दिला.**

न समजलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समजून घेण्याची गरज आहे.

प्रांतिक, धार्मिक व सांस्कृतिक अस्मितेच्या पलिकडे जाऊन राष्ट्रनिष्ठेला ठेच पोहचविणाऱ्या या गोष्टी पेक्षा मी प्रथम भारतीय आहे, आणि अंततः भारतीय राहीनही भूमिका सगळ्या भारतीय नागरिकांनी घेतली तरच आपण ताकदवान राष्ट्र बनवू शकतो. लोकशाहीला घातक असणारी भांडवलशाही व भ्रष्टाचार यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली भूमिका लोकशाही देशासाठी मार्गदर्शन ठरु शकते. डॉ. बाबासाहेबांचे कार्य हे भारत देशाला प्रगतीच्या आणि विकासाच्या मार्गावर नेणारे आहेत. असे यावेळी एम. एम. पवार यांनी बोलतांना सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार कधीच आपण फेडू शकत नाही. आपण जे काही आहोत ते त्यांच्यामुळेच आहोत. असे यावेळी अँड विशाल भालेराव यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले. तर मंगेश जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत गायकर, मुकेश जाधव, उद्योगपती प्रितम पाटील, संदीप पाटील, रुपेश भ. जाधव तर आदी प्रमुख म्हणून उपस्थित होते. यावेळी पडघा विभागातील विविध क्षेत्रातील नागरिक सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी आंबेडकर नगर कुरुंद येथील मंगेश जाधव, मयूर सोष्टे, वैभव सोष्टे, रोहित सोष्टे, प्रणव जाधव,सूरज भालेराव, विशाल सोष्टे या तरुणांनी मेहनत घेतली. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.तर आभार प्रदर्शन विशाल सोष्टे यांनी केले.



# नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग' साठी शहरी परिवहन सेवेत आमूलाग्र बदल करावेत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान २ वरून..) सध्या परिवहन सेवांसंदर्भात अस्तित्वात असलेले राज्याचे कायदे, नियम, केंद्र शासनाचे कायदे, विविध नियम यामध्ये अधिक्रमित होणार नाही, याची काळजी या प्राधिकरणाच्या कायद्यामध्ये घ्यावी. शहरात सुरू असलेले परिवहन संदर्भातील प्रकल्प गतीने पूर्ण होण्यासाठी एकच नियामक यंत्रणा असावी. यासाठी हे प्राधिकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नागरिकांना सुकर व सहज परिवहन सेवा 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' च्या स्वरूपात उपलब्ध व्हावी, यादृष्टीने प्राधिकरणाचे काम असावे. या प्राधिकरणात सर्व महानगरपालिकांचे महापौर, आयुक्त यांचा समावेश असावा. शहरातील परिवहन सेवा सुरळीत व सहज उपलब्ध होण्यासाठी प्राधिकरण नियोजन करेल. परिवहन सेवांची अंमलबजावणी संबंधित महापालिकडेच राहील. केवळ नियोजन, विकासाची बाब प्राधिकरणाकडे असेल. या प्राधिकरणांतर्गत कार्यकारी समिती असावी. शहरांमध्ये परिवहन सेवेचे विस्तार आणि नियोजन करताना भविष्यात प्राधिकरण शासनाला सल्लागार म्हणूनही काम करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरणबाबत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अप्पर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, बेस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवासन आदी उपस्थित होते.